वाचाः- १) दिनांक ०१/७/२०११ पूर्वी जि.प.जळगांव मार्फत देण्यांत आलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता स्थापत्य/विदयुत म्हणून नोंदण्या.

२)शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७/दिनांक १९ आक्टोंबर २०११

---

**सुशिक्षित बेरोजगार अभियंता नोंदणी रद्द आदेश.**

जाक्र.बांध./नोंदणी/आरआर/९०८/२०१६
बांधकाम विभाग ,जि.प.जळगांव
दिनांक :-१८/६/२०१६

जिल्हा परिषद,जळगांव मार्फत दिनांक ०१/०७/२०११ पूर्वी बहुतांशी सुशिक्षित बेरोजगार अभियंता स्थापत्य व विदयुत यांना दहा वर्ष मुदतीची नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्यांत आलेली आहेत. परंतु संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयातील तरतुदी पहाता सदरची प्रमाणपत्रे ही पाच वर्ष मुदतीची देणे आवश्यक असून पाच वर्ष कालावधी संपले नंतर संबंधीत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण करणे बंधनकारक आहे. व अशी नोंदणी नुतनीकरण देतांना ती सर्वसाधारण मक्तेदार म्हणून करणेत यावी अशी तरतुद संदर्भीय शासन निर्णयात आहे.

करिता दिनांक ०१/७/२०११ पूर्वी सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून नोंदणी केलेल्या सर्व स्थापत्य व विदयुत अभियंता यांना या आदेशान्वये जाहिररित्या कळविणेत येते की, दिनांक ०१/०७/२०११ पूर्वी सर्व स्थापत्य व विदयुत सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून देण्यांत आलेल्या नोंदण्या या आदेशान्वये रद्द करण्यांत आल्या असून दिनांक ०१/०७/२०११ पासून नोंदणी देण्यांत आलेल्या सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंता स्थापत्य व विदयुत यांनी त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण नोंदणी दिल्याच्या तारखेस पाच वर्षाचा कालावधी पुर्ण झालेवर करुन घेणे बंधनकारक राहील. पाच वर्षाच्या कालावधी नंतर सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून दिलेली मुळ नोंदणी आपोआप रद्द होईल याची सर्व नोंदणी कृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता स्थापत्य व विदयुत यांनी नोंद घ्यावी.

अति.मुख्य कार्यकारी अधिकरी ,
जिल्हा परिषद,जळगांव

प्रतः-जि.प.संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी संबंधीतास.

प्रतः-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,लघुसिंचन विभाग,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद,जळगांव यांना माहितीसाठी व त्यांचे कार्यालयाकडील नोंटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी रवाना.